**अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने दिलेल्या मान्यतेस अनुसरुन शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून नवीन संस्था सुरु करणे, राज्यातील विद्यमान विनाअनुदानित अभियांत्रिकी, एचएमसीटी, व्यवस्थापनशास्त्र, एमसीए अभ्यासक्रमाच्या पदवी व पदव्युत्तर पदवी संस्थेमध्ये नवीन अभ्यासक्रम सुरु करणे, सध्याच्या प्रवेश क्षमतेत वाढ, पूर्वी कमी केलेली प्रवेशक्षमता पूर्ववत करणे, तुकडी पूर्ण करणे, प्रादेशिक भाषेतील नवीन अभ्यासक्रम सुरु करणे तसेच पीआयओ/एनआरआय यांच्या नवीन व पूर्वीच्या जागांना मुदतवाढ देणे इ.साठी शासनाची मान्यता देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्रशिक्षण विभाग**
**शासन निर्णय क्र.टीईएम-२०२१/प्र.क्र. १२४/तांशि-४**
मादाम कामा रोड, हुतात्मा चौक राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: १८ ऑगस्ट, २०२१.

**वाचा :-**

१) संचालक, तंत्र शिक्षण यांचे पत्र क्र. २/एनजीसी/मान्यता/२०२१/६५२, दिनांक २६/०७/२०२१.
२) संचालक, तंत्र शिक्षण यांचे पत्र क्र. २/एनजीसी/मान्यता/२०२१/६६९, दिनांक ३०/०७/२०२१.

**प्रस्तावना :**

संचालक, तंत्रशिक्षण यांनी वर नमूद क्रमांक १ दिनांक २६/७/२०२१ व क्रमांक २ येथील दिनांक ३०/०७/२०२१ रोजीच्या पत्रान्वये विद्यमान कायम विनाअनुदानित अभियांत्रिकी, एचएमसीटी, व्यवस्थापनशास्त्र, एमसीए अभ्यासक्रमाच्या पदवी व पदव्युत्तर पदवी संस्थेमध्ये नवीन अभ्यासक्रम सुरु करणे, सध्याच्या प्रवेश क्षमतेत वाढ, पूर्वी कमी केलेली प्रवेशक्षमता पूर्ववत करणे, तुकडी पूर्ण करणे, प्रादेशिक भाषेत नवीन अभ्यासक्रम सुरु करणे तसेच नवीन संस्था सुरु करणे, पीआयओ/एनआरआय यांच्या नवीन व पूर्वीच्या जागांना मुदतवाढ देणे इ.बाबत शासन मान्यता देण्यासाठी प्रस्तावित केले आहे.

२. संचालक, तंत्रशिक्षण यांनी प्रस्तावित केल्याप्रमाणे शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून सोबतच्या Annexure - A, B, C व D मधील संस्थांच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे विद्यमान संस्थेमध्ये नवीन अभ्यासक्रम सुरु करणे, सध्याच्या प्रवेश क्षमतेत वाढ, पूर्वी कमी केलेली प्रवेशक्षमता पूर्ववत करणे, तुकडी पूर्ण करणे, प्रादेशिक भाषेत नवीन अभ्यासक्रम सुरु करणे तसेच नवीन संस्था सुरु करणे, पीआयओ/एनआरआय यांच्या नवीन व पूर्वीच्या जागांना मुदतवाढ देणे इ.बाबत शासन मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी दिलेल्या मान्यतेस अनुसरून संचालक, तंत्र शिक्षण यांनी प्रस्तावित केल्याप्रमाणे, शैक्षणिक वर्ष २०२१-२०२२ पासून सोबतच्या Annexure - A, B, C व D मधील संस्थांच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे विद्यमान कायम विनाअनुदानित/ शासकीय अभियांत्रिकी, एचएमसीटी, व्यवस्थापनशास्त्र, एमसीए अभ्यासक्रमाच्या पदवी व पदव्युत्तर पदवी संस्थेमध्ये नवीन अभ्यासक्रम सुरु करणे,सध्याच्या प्रवेश क्षमतेत वाढ, पूर्वी कमी केलेली प्रवेशक्षमता पूर्ववत करणे, तुकडी पूर्ण करणे, प्रादेशिक भाषेत नवीन अभ्यासक्रम सुरु करणे तसेच नवीन संस्था सुरु करणे, पीआयओ/ एनआरआय यांच्या नवीन व पूर्वीच्या जागांना कायम विनाअनुदानित तत्वावर मुदतवाढ देणे इ.बाबत खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून शासनाची मान्यता देण्यात येत आहे :-

१) सदर मंजूरी कायम विना अनुदान तत्वावर राहील.

२) प्रस्तुत बाबतीत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या तसेच दिनांक २१ मे, १९८३ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या अटींची पूर्तता करणे संबंधित संस्थेस बंधनकारक राहील. सदर अभ्यासक्रमासाठी संस्थेचे प्रवेक्षक्षमता वर नमुद केल्याप्रमाणे राहील.

३) शासनाने विहित केलेल्या तसेच अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली / फार्मसी कॉन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांनी विहित केलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत संस्थेस करारनामा करावा लागेल. तसेच संबंधित कागदपत्रांची आणि औपचारिक बाबींची पूर्तता संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य यांच्या संमतीने समाधानकारकरित्या करण्यात येईल.

४) संबंधित खाजगी संस्थेने संचालक, तंत्र शिक्षण यांचेकडे आवश्यक ती संचीत ठेव संयुक्त खात्यात भरुन इतर कायदेशीर बाबींची पूर्तता करावी.

५) सदर पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाचे प्रवेश शासनाने मान्य केलेल्या संबंधित अभ्यासक्रमाच्या प्रवेश नियमानुसार/पद्धतीनुसार करण्यात येतील.

६) शुल्क नियामक प्राधिकरणाने विहित केलेल्या शिक्षण शुल्कापेक्षा जास्त शुल्क संबंधित संस्थांनी आकारल्यास त्या संस्थांवर महाराष्ट्र एज्युकेशनल इन्स्टिट्यूशन (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) ॲक्ट, १९८७ अनुसार कारवाई करण्यात येईल.

७) संस्थेने अभ्यासक्रम चालविण्यास पूर्णवेळ शिक्षकवृंद व इतर तांत्रिक कर्मचारी शासन नियमाप्रमाणे नियुक्त करावेत. त्यांना नियमानुसार वेतन व भत्ते कर्मचाऱ्यांना देण्यात यावेत .तसेच शिक्षकवृंद व इतर कर्मचाऱ्यांच्या वेतन व भत्ते इत्यादीबाबत तसेच विद्यार्थ्यांकडून शासनाकडे तक्रारी आल्यास संस्थेवर कडक कारवाई करण्यात येईल.

८) संस्थेतील ग्रंथालयास आवश्यक ती पुस्तके, नियतकालिके अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मानकानुसार खरेदी करणे आवश्यक आहे. तसेच विद्यार्थ्यांना वाचनालयाचा पुरेपूर उपयोग होण्याच्या दृष्टीने ग्रंथालयात विद्यार्थ्यांना अभ्यासिकेची सोय करणे आवश्यक आहे. तसेच विद्यार्थ्यांना अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या मानकाप्रमाणे सर्व शैक्षणिक सोयीसुविधा (उदा. प्रयोगशाळा, वाचनालय, वर्गखोल्या इ.) करणे आवश्यक आहे.

९) रॅगिंग संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश व महाराष्ट्र प्रोहिबिशन ऑफ रॅगिंग ॲक्ट, १९९९ यांची कठोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक राहील.

२. याशिवाय संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई व संबंधित विद्यापीठ यांनी घालून दिलेल्या अन्य अटी व शर्ती लागू राहतील.

३. ज्या संस्थांनी संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे प्रोसेसिंग फी अदा केलेली नाही, त्या संस्थांकडून संचालकांनी अंतिम मान्यता देण्यापूर्वी ती वसूल करावी व केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमध्ये या शासन मान्यतेनुसार अभ्यासक्रमाचा समावेश होण्याकरिता संचालक, तंत्र शिक्षण यांनी आवश्यक ते आदेश पुढील १५ दिवसाच्या आत निर्गमित करावेत.

४. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२१०८१८१६३४२६३६०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Sanjay Audumbar Dharurkar

Digitally signed by Sanjay Audumbar Dharurkar
DN: CN = Sanjay Audumbar Dharurkar, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT
Date: 2021.08.20 18:28:27 +05'30'

**( संजय औ.धारुरकर )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रति,**

१. संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२. सर्व सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत).
३. सर्व अकृषि विद्यापीठांचे कुलसचिव (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत)
४. कुलसचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, जि.रायगड
५. संबंधित संस्था (संचालक,तंत्र शिक्षण यांच्यामार्फत)
६. अतिरिक्त सचिव (तांत्रिक), भारत सरकार, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, ७ वा मजला, चंद्रलोक भवन, जनपथ, नवी दिल्ली - ११० ००१.
७. सहायक शिक्षण सल्लागार (तांत्रिक), भारत सरकार, मनुष्यबळ विकास मंत्रालय (शिक्षण विभाग), नवी दिल्ली.
८. विभागीय अधिकारी, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, पश्चिम विभागीय कार्यालय, इंडस्ट्रियल इन्शुरन्स बिल्डींग, २ रा मजला, चर्चगेट, मुंबई.
९. निवड नस्ती/तांशि-४

| Sr. NO. | Institute Code | Permanent Id | Institute Name | Institute Address | District | Minority Institute | Women Institute | Program | University | Level | Name of Course | Intake Approved for 2020-21 | Intake Approved for 2021-22 | Variation | Remarks |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 134 | 6228 | 1-6049371 | D. Y. PATIL INSTITUTE OF MASTER OF COMPUTER APPLICATIONS AND MANAGEMENT | SECTOR NO - 29, NIGDI- PRADHIKRAN, AKURDI, PUNE - 411044 | PUNE | N | N | MCA | University of Pune, Pune | POST GRADUATE | MASTERS IN COMPUTER APPLICATIONS | 120 | 180 | 60 | Increase in Intake |
| 135 | 6250 | 1-5880923 | D. Y. PATIL COLLEGE OF ENGINEERING & TECHNOLOGY | KASABA - BAVADA, KOLHAPUR. | KOLHAPUR | N | N | ENGINEERING AND TECHNOLOGY | Shivaji University, Kolhapur | UNDER GRADUATE | COMPUTER SCIENCE AND ENGINEERING | 60 | 120 | 60 | Increase in Intake |
| 136 | 6250 | 1-5880923 | D. Y. PATIL COLLEGE OF ENGINEERING & TECHNOLOGY | KASABA - BAVADA, KOLHAPUR. | KOLHAPUR | N | N | ENGINEERING AND TECHNOLOGY | Shivaji University, Kolhapur | UNDER GRADUATE | MECHANICAL ENGINEERING | 30 | 60 | 30 | Increase in Intake |
| 137 | 6267 | 1-4830121 | KOLHAPUR INSTITUTE OF TECHNOLOGY'S COLLEGE OF | AT POST- GOKUL SHIRGAON, TAL-KARVEER, DIST. KOLHPAUR. | KOLHAPUR | N | N | ENGINEERING AND TECHNOLOGY | Shivaji University, Kolhapur | UNDER GRADUATE | COMPUTER SCEINCE & ENGINEERING(D | 0 | 60 | 60 | New Course |
| 138 | 6267 | 1-4830121 | KOLHAPUR INSTITUTE OF TECHNOLOGY'S COLLEGE OF ENGINEERING | AT POST- GOKUL SHIRGAON, TAL-KARVEER, DIST. KOLHPAUR. | KOLHAPUR | N | N | ENGINEERING AND TECHNOLOGY | Shivaji University, Kolhapur | UNDER GRADUATE | COMPUTER SCIENCE & ENGINEERING (ARTIFICIAL | 0 | 60 | 60 | New Course |
| 139 | 6269 | 1-10058361 | PADMABHOOSHAN VASANTRAODADA PATIL INSTITUTE OF TECHNOLOGY | AT- BUDHGAON, TALUKA- MIRAJ, DIST.-SANGLI. | SANGLI | N | N | ENGINEERING AND TECHNOLOGY | Dr. Babasaheb Ambedkar Technological University, Lonere | UNDER GRADUATE | COMPUTER SCIENCE AND ENGINEERING (ARTIFICIAL INTELLIGENCE AND DATA SCIENCE) | 0 | 60 | 60 | New Course |
| 140 | 6272 | 1-12346111 | D.Y.PATIL COLLEGE OF ENGINEERING | SECTOR-29,NIGDI-PRADHIKARAN,AKURDI, PUNE-411044 | PUNE | N | N | ENGINEERING AND TECHNOLOGY | University of Pune, Pune | UNDER GRADUATE | ROBOTICS AND AUTOMATION | 0 | 60 | 60 | New Course |
| 141 | 6273 | 1-3514117 | VISHWAKARMA INSTITUTE OF TECHNOLOGY | 666, UPPER INDIRANAGAR, BIBWEWADI | PUNE | N | N | ENGINEERING AND TECHNOLOGY | Savitribai Phule Pune University | UNDER GRADUATE | ARTIFICIAL INTELLIGENCE AND DATA SCIENCE | 120 | 180 | 60 | Increase in Intake |
| 142 | 6274 | 1-7640651 | PVG'S COLLEGE OF ENGINEERING AND TECHNOLOGY AND G.K. PATE (WANI) INSTITUTE OF MANAGEMENT | S.NO.44,VIDYANAGARI,SHIVDARSHAN,PARVATI,PUNE | PUNE | N | N | ENGINEERING AND TECHNOLOGY | University of Pune, Pune | UNDER GRADUATE | ARTIFICIAL INTELLIGENCE AND DATA SCIENCE | 0 | 60 | 60 | New Course |
| 143 | 6275 | 1-3548907 | S.V.P.M.'S COLLEGE OF ENGINEERING | A/P- MALEGAON (BK), TAL- BARAMATI, DIST-PUNE, PIN- 413115, MAHARASHTRA, INDIA | PUNE | N | N | ENGINEERING AND TECHNOLOGY | University of Pune, Pune | UNDER GRADUATE | COMPUTER ENGINEERING | 60 | 90 | 30 | Increase in Intake |
| 144 | 6275 | 1-3548907 | S.V.P.M.'S COLLEGE OF ENGINEERING | A/P- MALEGAON (BK), TAL- BARAMATI, DIST-PUNE, PIN- 413115, MAHARASHTRA, INDIA | PUNE | N | N | ENGINEERING AND TECHNOLOGY | University of Pune, Pune | UNDER GRADUATE | INFORMATION TECHNOLOGY | 30 | 60 | 30 | Increase in Intake |

**अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने दिलेल्या मान्यतेस अनुसरुन शैक्षणिक वर्ष २०२०-२१ पासून राज्यातील विद्यमान विनाअनुदानित अभियांत्रिकी, एचएमसीटी, व्यवस्थापनशास्त्र, एमसीए अभ्यासक्रमाच्या पदवी व पदव्युत्तर पदवी संस्थेमध्ये नवीन अभ्यासक्रम सुरु करणे, सध्याच्या प्रवेश क्षमतेत वाढ, पूर्वी कमी केलेली प्रवेशक्षमता पूर्ववत करणे, तुकडी पूर्ण करणे इ.बाबत व शासनाची मान्यता देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्रशिक्षण विभाग**
**शासन निर्णय क्र.टीईएम-२०२०/प्र.क्र. १०२/तांशि-४**
मादाम कामा रोड, हुतात्मा चौक राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: १३ ऑगस्ट, २०२०.

<u>वाचा</u> : १) संचालक, तंत्र शिक्षण यांचे पत्र क्र. २/एनजीसी/मान्यता/ २०२०/४८५, दिनांक ०८/०७/२०२०.
२) संचालक, तंत्र शिक्षण यांचे पत्र क्र. २/एनजीसी/मान्यता/ २०२०/५०८, दिनांक १६/०७/२०२०.

**<u>प्रस्तावना :</u>**

संचालक, तंत्रशिक्षण यांनी वर नमूद दिनांक १०/७/२०२० च्या विद्यमान कायम विनाअनुदानित अभियांत्रिकी, एचएमसीटी, व्यवस्थापनशास्त्र, एमसीए अभ्यासक्रमाच्या पदवी व पदव्युत्तर पदवी संस्थेमध्ये नवीन अभ्यासक्रम सुरु करणे, सध्याच्या प्रवेश क्षमतेत वाढ, पूर्वी कमी केलेली प्रवेशक्षमता पूर्ववत करणे, तुकडी पूर्ण करणे इ.बाबत शासन मान्यता देण्यासाठी प्रस्तावित केले आहे.

२. संचालक, तंत्रशिक्षण यांनी प्रस्तावित केल्याप्रमाणे शैक्षणिक वर्ष २०२०-२१ पासून सोबतच्या Annexure "A" मधील संस्थांच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे विद्यमान संस्थेमध्ये नवीन अभ्यासक्रम सुरु करणे, सध्याच्या प्रवेश क्षमतेत वाढ, पूर्वी कमी केलेली प्रवेशक्षमता पूर्ववत करणे, तुकडी पूर्ण करणे इ.बाबत शासन मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी दिलेल्या मान्यतेस अनुसरून संचालक, तंत्र शिक्षण यांनी प्रस्तावित केल्याप्रमाणे, शैक्षणिक वर्ष २०२०-२०२१ पासून सोबतच्या Annexure "A" मधील संस्थांच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे विद्यमान कायम विनाअनुदानित/शासकीय अभियांत्रिकी, एचएमसीटी, व्यवस्थापनशास्त्र, एमसीए अभ्यासक्रमाच्या पदवी व पदव्युत्तर पदवी संस्थेमध्ये नवीन अभ्यासक्रम सुरु करणे, सध्याच्या प्रवेश क्षमतेत वाढ, पूर्वी कमी केलेली प्रवेशक्षमता पूर्ववत करणे, तुकडी पूर्ण करणे इ.बाबत खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून शासनाची मान्यता देण्यात येत आहे :-

१) सदर मंजूरी कायम विना अनुदान तत्वावर राहील.

२) प्रस्तुत बाबतीत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या तसेच दिनांक २१ मे, १९८३ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या अटींची पूर्तता करणे संबंधित संस्थेस बंधनकारक राहील. सदर अभ्यासक्रमासाठी संस्थेचे प्रवेक्षक्षमता वर नमुद केल्याप्रमाणे राहील.

३) शासनाने विहित केलेल्या तसेच अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली / फार्मसी कॉन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांनी विहित केलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत संस्थेस करारनामा करावा लागेल. तसेच संबंधित कागदपत्रांची आणि औपचारिक बाबींची पूर्तता संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य यांच्या संमतीने समाधानकारकरित्या करण्यात येईल.

४) संबंधित संस्थेने संचालक, तंत्र शिक्षण यांचेकडे आवश्यक ती संचीत ठेव संयुक्त खात्यात भरुन इतर कायदेशीर बाबींची पूर्तता करावी.

५) सदर पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाचे प्रवेश शासनाने मान्य केलेल्या संबंधित अभ्यासक्रमाच्या प्रवेश नियमानुसार /पद्धतीनुसार करण्यात येतील.

६) शुल्क नियामक प्राधिकरणाने विहित केलेल्या शिक्षण शुल्कापेक्षा जास्त शुल्क संबंधित संस्थांनी आकारल्यास त्या संस्थांवर महाराष्ट्र एज्युकेशनल इन्स्टिट्यूशन (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) ॲक्ट, १९८७ अनुसार कारवाई करण्यात येईल.

७) संस्थेने अभ्यासक्रम चालविण्यास पूर्णवेळ शिक्षकवृंद व इतर तांत्रिक कर्मचारी शासन नियमाप्रमाणे नियुक्त करावेत. त्यांना नियमानुसार वेतन व भत्ते कर्मचाऱ्यांना देण्यात यावेत .तसेच शिक्षकवृंद व इतर कर्मचाऱ्यांच्या वेतन व भत्ते इत्यादीबाबत तसेच विद्यार्थ्यांकडून शासनाकडे तक्रारी आल्यास संस्थेवर कडक कारवाई करण्यात येईल.

८) संस्थेतील ग्रंथालयास आवश्यक ती पुस्तके, नियतकालिके अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मानकानुसार खरेदी करणे आवश्यक आहे. तसेच विद्यार्थ्यांना वाचनालयाचा पुरेपूर उपयोग होण्याच्या दृष्टीने ग्रंथालयात विद्यार्थ्यांना अभ्यासिकेची सोय करणे आवश्यक आहे. तसेच विद्यार्थ्यांना अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या मानकाप्रमाणे सर्व शैक्षणिक सोयीसुविधा (उदा. प्रयोगशाळा, वाचनालय, वर्गखोल्या इ.) करणे आवश्यक आहे.

९) रॅगिंग संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश व महाराष्ट्र प्रोहिबिशन ऑफ रॅगिंग ॲक्ट, १९९९ यांची कठोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक राहील.

२. याशिवाय संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई व संबंधित विद्यापीठ यांनी घालून दिलेल्या अन्य अटी व शर्ती लागू राहतील.

३. ज्या संस्थांनी संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे प्रोसेसिंग फी अदा केलेली नाही, त्या संस्थांकडून संचालकांनी अंतीम मान्यता देण्यापूर्वी ती वसूल करावी.

४. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२००८१३१५०२३१९१०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SANJAY AUDUMBAR DHARURKAR

Digitally signed by SANJAY AUDUMBAR DHARURKAR
DN: CN = SANJAY AUDUMBAR DHARURKAR, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPT
Date: 2020.08.14 13:08:03 +05'30'

**( संजय औ.धारुरकर )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रति,**

१. संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२. सर्व सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत).
३. सर्व अकृषि विद्यापीठांचे कुलसचिव (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत)
४. कुलसचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, जि.रायगड
५. संबंधित संस्था (संचालक,तंत्र शिक्षण यांच्यामार्फत)
६. अतिरिक्त सचिव (तांत्रिक), भारत सरकार, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, ७ वा मजला, चंद्रलोक भवन, जनपथ, नवी दिल्ली - ११० ००१.
७. सहायक शिक्षण सल्लागार (तांत्रिक), भारत सरकार, मनुष्यबळ विकास मंत्रालय (शिक्षण विभाग), नवी दिल्ली.
८. विभागीय अधिकारी, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, पश्चिम विभागीय कार्यालय, इंडस्ट्रियल इन्शुरन्स बिल्डींग, २ रा मजला, चर्चगेट, मुंबई.
९. निवड नस्ती/तांशि-४

| Sr. No. | Institute Code | Institute Name | Institute Address | District | Program | University | Level | Name of Course | Intake Approved for 2019-20 | Intake Approved for 2020-21 | Variation | Course Applied for |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 240 | 6219 | BHARAT RATNA INDIRA GANDHI COLLEGE OF ENGINEERING | GAT NO 58/3, PUNE- SOLAPUR NATIONAL HIGHWAY NO. 9, NEAR SOLAPUR UNIVERSITY, KEGAON, SOLAPUR. | SOLAPUR | ENGINEERING AND TECHNOLOGY | Dr. Babasaheb Ambedkar Technological University, Lonere | UNDER GRADUATE | BIOMEDICAL ENGINEERING | 30 | 54 | 24 | EoA Only |
| 241 | 6219 | BHARAT RATNA INDIRA GANDHI COLLEGE OF ENGINEERING | GAT NO 58/3, PUNE- SOLAPUR NATIONAL HIGHWAY NO. 9, NEAR SOLAPUR UNIVERSITY, KEGAON, SOLAPUR. | SOLAPUR | ENGINEERING AND TECHNOLOGY | Dr. Babasaheb Ambedkar Technological University, Lonere | UNDER GRADUATE | CIVIL ENGINEERING | 30 | 54 | 24 | EoA Only |
| 242 | 6222 | D.K.T.E. SOCIETY'S TEXTILE & ENGINEERING INSTITUTE | "RAJWADA" POST BOX NO. 130 | KOLHAPUR | ENGINEERING AND TECHNOLOGY | Shivaji University, Kolhapur | UNDER GRADUATE | ELECTRONICS AND TELECOMMUNICATIONS ENGINEERING | 90 | 54 | -36 | EoA Only |
| 243 | 6223 | Nagesh Karajagi Orchid College of Engineering and Technology, Solapur. | POST BOX NO. 154, GUT NO. 16, SOLAPUR-TULJAPUR ROAD, TALE HIPPARAGA, SOLAPUR. TAHSIL- NORTH SOLAPUR, DIST. SOLAPUR. PIN CODE- 413 002. MAHARASHTRA. | SOLAPUR | ENGINEERING AND TECHNOLOGY | Dr. Babasaheb Ambedkar Technological University, Lonere | UNDER GRADUATE | ELECTRICAL ENGINEERING | 30 | 60 | 30 | EoA Only |
| 244 | 6228 | D. Y. PATIL INSTITUTE OF MASTER OF COMPUTER APPLICATIONS AND MANAGEMENT | SECTOR NO - 29, NIGDI-PRADHIKRAN, AKURDI, PUNE - 411044 | PUNE | MANAGEMENT | University of Pune, Pune | POST GRADUATE | MBA | 60 | 120 | 60 | EoA Only |

**अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मान्यतेनुसार राज्यात सुरु असलेल्या खाजगी विना अनुदानित एम. सी.ए. अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयात प्रवेशक्षमता बदल करण्यास, नवीन पदवी/पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यास शासनाची मान्यता देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्रशिक्षण विभाग,**
**शासन निर्णय** क्र. टिईएम-२०१०/(१६५/१०)/तांशि-४,
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक : - ३० जून, २०१० .

संदर्भ :- १) अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी त्यांच्या संकेतस्थळावर प्रकाशित केलेली यादी .
२) संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी सादर केलेले पत्र क्र. २/एनजीसी/अभातांशिप-यादी/शा.मान्यता/२०१०/१२४१, दिनांक ३० जून, २०१०

**शासन निर्णय:-** अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने त्यांच्या संकेत स्थळावर शैक्षणिक वर्ष २०१०-११ करिता खाली नमूद केलेल्या संस्थेस एम.सी.ए अभ्यासक्रमात प्रवेशक्षमता बदल व व्यवस्थापनशास्त्र अभ्यासक्रम द्वितीय पाळीमध्ये सुरु करण्यास खालीलप्रमाणे मान्यता दिलेली आहे. त्यास अनुसरुन याबाबत शासन निर्णय निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

| **अ.क्र.** | **संस्थेचे नांव** | **अभ्यासक्रमाचे नांव** | **शै. व. २००९-१० ची प्रवेशक्षमता** | **शै. व. २०१०-११ ची प्रवेशक्षमता** |
|---|---|---|---|---|
| १ | पद्मश्री डी. वाय. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ मास्टर ऑफ कॉम्प्युटर ॲप्लीकेशन्स, सेक्टर क्र. २९, आकुर्डी, पुणे ४११ ०४४. | एम. सी. ए. | ६० | १२० |
| | | एम. बी. ए. **(द्वितीय पाळी)** | ०० | ६० |

आता या शासन निर्णयाद्वारे उपरोक्त संस्थेस खालील अटी व शर्तीवर शैक्षणिक वर्ष २०१०-११ करिता एम.सी. ए. अभ्यासक्रमात प्रवेशक्षमता बदल व व्यवस्थापनशास्त्र अभ्यासक्रम द्वितीय पाळीमध्ये सुरु करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

१) प्रस्तुत बाबतीत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या तसेच दिनांक २१ मे, १९८३ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या अटींची पूर्तता करणे संबंधित संस्थेस बंधनकारक राहील.

२) शासनाने विहित केलेल्या तसेच अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत संस्थेस करारनामा करावा लागेल. तसेच संबंधित कागदपत्रांची आणि



Pad. Dr. DYPIMCA
Inward No. : 146
Date : 14/07/2010

औपचारिक बाबींची पूर्तता संचालक ( तंत्रशिक्षण ) यांच्या संमतीने समाधानकारकरित्या करण्यात येईल.

३) सदर अभ्यासक्रमाच्या संलग्नीकरणासाठी संबंधित संस्थेने महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ मधील तरतूदीनुसार संबधित विद्यापीठाची मान्यता/संलग्नीकरण घेणे आवश्यक आहे.

४) संबंधित संस्थेने संचालक ( तंत्रशिक्षण ) यांचेकडे आवश्यक ती संचीत ठेव संयुक्त खात्यात भरुन इतर कायदेशीर बाबींची पूर्तता करावी.

५) सदर पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांचे प्रवेश शासनाने मान्य केलेल्या संबंधित अभ्यासक्रमाच्या प्रवेश नियमानुसार /पध्दतीनुसार करण्यात येतील.

६) शिक्षण शुल्क समितीने विहित केलेल्या शिक्षण शुल्कापेक्षा जास्त शुल्क संबंधित संस्थांनी आकारल्यास त्या संस्थांवर महाराष्ट्र एज्युकेशनल इन्स्टिट्यूशन (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) ॲक्ट, १९८७ नुसार कारवाई करण्यात येईल.

७) रॅगिंग संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश व महाराष्ट्र प्रोहिबिशन ऑफ रॅगिंग ॲक्ट, १९९९ यांची कठोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

८) याशिवाय संचालक ( तंत्रशिक्षण) महाराष्ट्र राज्य, मुंबई व संबंधित विद्यापीठ यांनी घालून दिलेल्या अन्य अटी व शर्ती लागू राहतील.

९) दुसऱ्या पाळीसाठी अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, महाराष्ट्र शासन व संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी विहित केलेल्या/करावयाच्या अटींची पूर्तता करणे संबंधित संस्थेस बंधनकारक राहील.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,**

( भ. सं. वानखेडे )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
कुलसचिव, पुणे विद्यापीठ, पुणे.
संबंधित संस्था (संचालकांमार्फत )
प्रत माहितीसाठी
अतिरिक्त सचिव (तांत्रिक), भारत सरकार, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, ७वा मजला, चंद्रलोक भवन, जनपथ, नवी दिल्ली ११०००१
सहाय्यक शिक्षण सल्लागार (तांत्रिक), भारत सरकार, मनुष्यबळ विकास मंत्रालय (शिक्षण विभाग), पश्चिम विभागीय कार्यालय, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, इंडस्ट्रियल इन्शुरन्स बिल्डींग, दुसरा मजला, चर्चगेट, मुंबई
निवड नस्ती.

खाजगी संस्थांमधील एम.सी.ए. अभ्यासक्रमाच्या प्रवेशक्षमतेत वाढ / घट करण्याबाबत.

---

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
शासन निर्णय, क्रमांक : टीईएम-२००३/(३०२/०३)/तांशि-१
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक : २२ ऑगस्ट, २००३

संदर्भ : अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांची दि.७ मे,२००३ व दि.२६.६.२००३ ची पत्रे.

**शासन निर्णय :** अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने त्यांच्या संदर्भाधिन दिनांक ७.५.२००३ व २६.६.२००३ च्या पत्रान्वये दोन खाजगी संस्थांमधील एम.सी.ए.अभ्यासक्रमाच्या विस्तारास मान्यता देताना एम.सी.ए. या अभ्यासक्रमाच्या प्रवेशक्षमतेत शैक्षणिक वर्ष २००३-०४ मध्ये वाढ / घट करण्यासाठी मान्यता दिलेली आहे. सदर मान्यता विचारात घेऊन खालील दोन संस्थातील एम.सी.ए. अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमतेत शैक्षणिक वर्ष २००३-०४ मध्ये वाढ / घट करण्यासाठी या शासन निर्णयान्वये मंजूरी देण्यात येत आहे. सदर मान्यता ही महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ च्या कलम ८२(५) व ८३(५) मधील तरतुदी विचारात घेऊन देण्यात येत आहे.

| अ.क्र. | संस्थेचे नाव | अभ्यासक्रम | प्रवेशक्षमता |
|---|---|---|---|
| १. | विद्याप्रतिष्ठानचे इन्स्टि. ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी, एम.आय.डी.सी., बारामती, जि. पुणे | एम.सी.ए. (पूर्णवेळ) | ६० वरुन ३० |
| २ | पद्मश्री डॉ.डी.वाय.पाटील इन्स्टि. ऑफ मास्टर ऑफ कॉम्प्युटर ॲप्लीकेशन, आकुर्डी, पुणे | एम.सी.ए. (पूर्णवेळ) | ४५ वरुन ६० |

सदर मान्यता खालील अटी व शर्तीवर देण्यात येत आहे :-

१) प्रस्तुत बाबतीत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहीत केलेल्या तसेच दि.२१ मे,१९८३ च्या शासन निर्णयान्वये विहीत केलेल्या अटींची पूर्तता करणे संस्थेस बंधनकारक राहील.

२) शासनाने विहीत केलेल्या तसेच अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहीत केलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत ( शैक्षणिक शुल्क व प्रवेश प्रक्रिया ) संस्थेस करारनामा करावा लागेल तसेच संबंधीत कागदपत्रांची आणि औपचारिक बाबींची पूर्तता तंत्रशिक्षण संचालकांच्या संमतीने समाधानकारक रित्या करण्यात येईल.

३) या अभ्यासक्रमाच्या प्रवेशक्षमता वाढीच्या संलग्नीकरणासाठी संबंधीत संस्थेने संबंधीत विद्यापीठाची मान्यता घेणे आवश्यक आहे.

Padm. Dr. D.Y.P. IMCA
Inward No. : 109
Date : 10/9/03

४) संबंधीत संस्थेने संचालक, तंत्रशिक्षण यांचेकडे आवश्यक ती संचित ठेव संयुक्त खात्यात भरुन इतर कायदेशीर बाबींची पूर्तता करावी.

५) दि.१६ एप्रिल.२००३ च्या शासन निर्णयानुसार एम.सी.ए. अभ्यासक्रमातील प्रवेश संस्थामार्फत करण्यात येतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( श्या.र.चौरे )
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य मुंबई
मा. कुलसचिव, पुणे विद्यापीठ, पुणे
सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, पुणे
संबंधीत संस्थांना
निवड नस्ती तांशि-१

प्रत,

१) अतिरिक्त सचिव (तांत्रिक) भारत सरकार अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, इंदिरा गांधी खेल परिसर, इंद्रप्रस्थ इस्टेट, नवी दिल्ली ११०००

२) सहाय्यक शिक्षण सल्लागार (तांत्रिक) भारत सरकार मनुष्यबळ विकास मंत्रालय, (शिक्षण विभाग) पश्चिम विभागीय कार्यालय, इंडस्ट्रीयल इंन्श्युरन्स बिल्डींग, दुसरा मजला, चर्चगेट, मुंबई

महाराष्ट्र शासन

उच्च व तंत्रशिक्षण विभाग,

**शासन निर्णय,क्रमांक-टिईएम- २००२/(१८३/०२)तांशि.१**

मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२

**दिनांक :- १० जून, २००२**

**संदर्भ:** अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांची
दिनांक २७ मे,.२००२ ची पत्रे

**शासन निर्णय:-** अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने त्यांच्या संदर्भाधीन दिनांक २७ मे, २००२ च्या निरनिराळ्या पत्रान्वये राज्यातील खाजगी संस्थाना नवीन अभियांत्रिकी महाविद्यालय व एम.सी.ए. अभ्यासक्रम आणि एम.एम.एस. अभ्यासक्रम सन २००२-२००३ पासून सुरु करण्यासाठी मंजूरी दिली आहे. त्यास अनुसरुन याबाबतचे शासकीय आदेश निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

२. आता या शासन निर्णयान्वये खालील खाजगी संस्थांना शैक्षणिक वर्ष २००२-२००३ पासून नवीन अभियांत्रिकी महाविद्यालय व एम.सी.ए. अभ्यासक्रम आणि एम.एम.एस. अभ्यासक्रम कायम विना अनुदान तत्वावर सुरु करण्यासाठी मंजूरी देण्यात येत आहे.

| अ.क्र | संस्थेचे नांव | अभ्यासक्रम | प्रवेशक्षमता |
|---|---|---|---|
| १. | बनिलाल रामनाथ अग्रवाल चॅरिटेबल ट्रस्टचे विश्वकर्मा इन्स्टिटयुट ऑफ इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी, पुणे | १. कॉम्पुटर इंजि. | ६० |
| | | २. इन्फॉर्मेशन टेक्नॉ. | ६० |
| | | ३. इलक्ट्रॉनिक्स ॲन्ड टेलिकम्युनिकशन इंजि. | ६० |
| २. | मत्सोदरी शिक्षण संस्थेचे कॉलेज ऑफ इंजि. ॲन्ड टेक्नॉ.नागेवाडी औरंगाबाद रोड , जालना | १. इन्फार्मेशन टेक्नॉ. | ६० |
| | | २. कॉम्प्युटर सायन्स ॲन्ड इंजि. | ६० |
| | | ३. इलक्ट्रॉनिक्स ॲन्ड कम्युनिकेशन इंजिनियरिंग | ६० |
| | | ४. मॅकॅनिकल इंजिनियरिंग | ६० |
| ३. | श्री. हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाचे पोस्ट ग्रॅज्युएट डिपार्टमेंट ऑफ कॉम्पुटर सायन्स ॲन्ड टेक्नॉ. हनुमान व्यायाम नगर , अमरावती | १.इन्फार्मेशन टेक्नॉ. | ६० |
| | | २.कॉम्पुटर सायन्स ॲन्ड इंजि. | ६० |
| | | ३.इलेक्ट्रॉनिक्स ॲन्ड कम्युनिकेशन | ६० |
| ४ | द साऊथ इंडियन सोसायटीचे ग्रॅज्युएट स्कूल ऑफ टक्नॉलॉजी, श्री. चंद्रशेखरन्द सरस्वती विद्यापुरम प्लॉट १ सी व १ ई नेरुळ ,नवी मुंबई | १.इन्फार्मेशन टेक्नॉ. | ६० |
| | | २.कॉम्पुटर इंजि. | ६० |
| | | ३.इलेक्ट्रॉनिक्स ॲन्ड टेलि कम्युनिकेशन इंजिनियरिंग | ६० |
| ५. | औद्योगिक तंत्र शिक्षण संस्थेचे इन्स्टिटयु. ऑफ इंडस्ट्रियल ॲन्ड कॉम्पुटर मॅनेजमेंट ॲन्ड रिसर्च एच.एस./२ सेक्टर -२७ पी.सी.ॲन्ड डी.टी.ए. प्राधिकरण निगडी- पुणे | एम.सी.ए. | ६० |

| | | | |
|---|---|---|---|
| ६. | भारती विद्यापीठ भवन चे भारती विद्यापीठ इन्स्टिटयुट ऑफ मॅनेजमेंट अॅन्ड इन्फॉर्मेशन टेक्नॉ. सेक्टर -८ .सी.बी.डी..नवी मुंबई. | एम.सी.ए. | ६० |
| ७. | डॉ. डी.वाय. पाटील प्रतिष्ठानचे पद्मश्री डॉ. डी.वाय.पाटील इन्स्टिटयुट ऑफ मास्टर ऑफ कॉम्प्युटर ॲप्लीकेशन आकुर्डी ,पुणे | एम.सी.ए. | ६० |
| ८ | गोदावरी फाऊंडेशनचे डॉ. उल्हास पाटील इन्स्टिटयुट इन कॉम्प्युटर टेक्नॉलॉजी एम.आय.डी.सी. एरिया. जळगांव | एम.सी.ए. | ६० |
| ९ | लोकमान्य टिळक जनकल्याण शिक्षण संस्थेचे प्रियदर्शनी इन्स्टिटयुट ऑफ कॉम्प्युटर ॲप्लीकेशन अॅन्ड रिसर्च. डिगडोह. हिंगणा. नागपूर | एम.सी.ए. | ६० |
| १० | नगांव एज्युकेशन सोसायटीचे गंगामाई इन्स्टिटुट ऑफ मॅनेजमेंट मु.पो. नगांव . ता.जि.धुळे | एम.सी.ए. | ३० |
| ११ | नवयुवक विद्यापीठ ट्रस्ट चे जंजराबाई अंतुले कॉम्प्युटर अॅकडमी,लाडवली, रायगड रोड,महाड जि. रायगड | एम.सी.ए. | ६० |
| १२ | उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगांवचे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ( डिपार्टमेंट ऑफ कॉम्प्युटर सायन्स ) पोस्ट बॉक्स नं. ८०.एन.एच. नं.०६ जळगांव | एम.सी.ए. | ६० |
| १३ | एस.एस.डी.एज्यु. फाऊंडेशनचे इन्स्टि ऑफ मॅनेजमेंट टेक्नॉलॉजी मु.पो. न-हे, ता. हवेली. जि.पुणे | एम.सी.ए. | ३० |
| १४ | प्रोग्रेसिव एज्युकेशन सोसायटीचे इन्स्टिटयुट ऑफ मॅनेजमेंट अॅन्ड करिअर डव्हलपमेंट सेक्टर-२१ यमुना नगर .निगडी.पुणे | एम.सी.ए. | ६० |
| १५ | संत चिकित्सा प्रसारक मंडळाचे डॉ.बाबासाहेब नंदूकर कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन. श्री. सत्य साई क्रिडा नगरी.वाघापूर,यवतमाळ. | एम.सी.ए. | ६० |
| १६ | श्री.नागपूर गुजराथी मंडळाचे व्ही.एन.एस. कॉमर्स , जे.एम.ठक्कर आटर्स अॅन्ड जे.जे. पटेल सायन्स कॉलेज,वर्धमान नगर ,नागपूर | एम.सी.ए. | ६० |
| १७ | वीरमाता जिजाबाई टेक्नॉलॉजीकल इन्स्टिटयुट ( व्ही.जे.टी.आय. ) एच.आर. महाजनी मार्ग, माटुंगा. मुंबई. | एम.सी.ए. | ६० |
| १८ | सोसायटी फॉर द कॉप्रेशन ऑफ फ्रान्सिसकन चे सेंट फ्रॅन्सिस इन्स्टियुट ऑफ मॅनेजमेंट अॅन्ड रिसर्च माऊंट मेरी पायसर, एस व्ही. पी रोड, बोरीवली मुंबई | एम.एम.एस. | ६० |
| १९ | शिरोमणी गुरुद्वारा प्रबंधक कमिटी अमृतसर चे गुरुनानक इन्स्टिटयुट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज द्वारा गुरुनानक कॉ.गुरु नानक खालसा कॉलेज.माटुंगा. मुंबई | एम.एम.एस. | ६० |

२. सदर मान्यता ही खालील अटी व शर्तीवर देण्यात येत आहे :-

१ ) प्रस्तुत बाबतीत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या तसेच दिनांक २१ मे, १९८३ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या अटींची पूर्तता करणे संस्थेस बंधनकारक राहील.

२ ) शासनाने विहित केलेल्या तसेच अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत संस्थेस करारनामा करावा लागेल. तसेच संबंधित कागदपत्रांची आणि औपचारिक बाबींची पूर्तता तंत्रशिक्षण संचालकांच्या संमतीने समाधानकारकरित्या करण्यात येईल.

३ ) वरील अभ्यासक्रमाच्या संलग्नीकरणा संबंधित संस्थेने संबंधित विद्यापीठाची मान्यता घेणे आवश्यक आहे.

४ ) संबंधित संस्थेने संचालक, तंत्रशिक्षण यांच्याकडे आवश्यक ती संचित ठेव संयुक्त खात्यात भरुन इतर कायदेशीर बाबींची पूर्तता करावी.

५ ) सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानुसार शासनाने सन १९९३-९४ मध्ये विहित केलेल्या नियमानुसार संबंधित संस्थेतील अभियांत्रिकी महाविद्यालयाचे व एम.एम.एस. अभ्यासक्रमाचे प्रवेश संचालक, तंत्रशिक्षण यांच्यामार्फत करण्यात येतील.

४. याबाबत आवश्यक त्या औपचारिक बाबींची पूर्तता करण्यासाठी संबंधित संस्थेने संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई-१ यांच्याशी त्वरित संपर्क साधावा. संचालक, तंत्रशिक्षण यांनी याबाबत आवश्यक त्या नोंदी अभ्यासक्रम विषयक नोंद वहीत ठेवाव्यात

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.**

( श्या. र. चौरे )

**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

प्रति,

संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई-१

सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई /पुणे/औरंगाबाद /नाशिक/नागपूर /अमरावती

कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, मुंबई

कुलसचिव ,पुणे विद्यापीठ पुणे

कुलसचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

कुलसचिव, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

कुलसचिव, अमरावती विद्यापीठ अमरावती

कुलसचिव, नागपूर विद्यापीठ, नागपूर

संबंधित संस्थेस-

प्रत, माहितीसाठी-

१ ) अतिरिक्त सचिव, ( तांत्रिक ) भारत सरकार अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, इंदिरा गांधी खेल परिसर, इंद्रप्रस्थ इस्टेट, नवी दिल्ली-११०००२

२ ) सहाय्यक शिक्षण सल्लागार ( तांत्रिक ) भारत सरकार मनुष्यबळ विकास मंत्रालय, ( शिक्षण विभाग ) पश्चिम विभागीय कार्यालय, इंडस्ट्रियल इन्शुरन्स बिल्डींग, दुसरा मजला, चर्चगेट, मुंबई